दि. 28/10/2026

प्रेसनोट

पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाची नांदेडमध्ये अवैध वाळू विरुध्द मोठी कारवाई

28 लाखांची साधनसामुग्री व वाळू जप्त

नांदेड जिल्ह्यातील अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरुद्ध पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी यांच्या पथकाने विमानतळ पोलीस ठाणे हद्दीतील मौजे ब्राम्हणवाडा शिवारात मोठी कारवाई केली आहे.

दिनांक 27.10.2026 रोजी मौजे ब्राम्हणवाडा ते पाथरड जाणारे रोड लगत अवैधरित्या वाळूची साठवणूक केल्याची माहिती पथकास प्राप्त झाली होती. पथकाच्या छाप्यात, गोदावरी नदी पात्रातून वाळूचा उपसा करुन सदर ठिकाणी साठा केल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे, साठा केलेली वाळू पोकलेनच्या सहाय्याने वाहनात भरत असल्याचेही निदर्शनास आले. सदर ठिकाणाहून पथकाने, एक पोकलेन, एक टिप्पर व नदीपात्रातून बाहेर काढून साठवणूक केलेली (60) ब्रास वाळू, असा एकूण 28,15,000/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

नमूद प्रकरणात (2) इसमांविरुध्द कारवाई करुन, त्यांचेविरुध्द विमानतळ पोलीस ठाणे येथे गुरनं 538/2026 कलम 303 (2), 3(5) भा.न्या.सं. सह कलम 48 (7), 48 (8) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/ गणेश राठोड, पोहेकॉ/ संदिप वाघाडे व पोहेकॉ/ गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

' खबर ' हेल्पलाइन वरुन माहिती द्या : अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलीसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, सदर हेल्पलाइन वरून नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहचवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड.